# मेट्रो ३ मार्गातील रस्ते पूर्ववत होण्यास सुरुवात

## वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मेट्रो ३-मार्गातील बोगद्याची कामे संपली असून स्थानक उभारण्याची कामेही निम्म्यापेक्षा जास्त पूर्ण झाली आहेत. त्यामुळे अनेक भागातील रस्ते वाहतुकीसाठी पूर्ववत करण्यात आले आहेत. त्यामुळे विशेष करून दक्षिण मुंबई आणि धारावी या गर्दीच्या ठिकाणी प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना दिलासा मिळू लागला आहे.

मेट्रो ३ या भूमिगत प्रकल्पासाठी अनेक भागातील रस्ते ताब्यात घेण्यात आले होते. बोगदे खोदण्यासाठी भूगर्भात यंत्रे उतरवण्यासाठी हे रस्ते ताब्यात घेण्यात आले होते. शिवाय ज्या ठिकाणी मेट्रोचे स्थानक बांधले जात आहे, तेथील रस्तेही बंद होते. तर काही ठिकाणी वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला होता. काही मार्ग एकदिशा करण्यात आले होते.

आता बोगद्याची कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. तर स्थानकांची कामेही निम्म्यापेक्षा जास्त पूर्ण झाली आहेत. त्यामुळे संबंधित भागातील रस्ते पूर्ववत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

धारावी 'टी' जंक्शन येथील रस्ता पूर्ववत झाल्याने तेथील वाहतूक कोंडी सुटली आहे. धारावी ते माहीम हा रस्ता पूर्वीसारखा झाला आहे. हुतात्मा चौक स्थानक जवळील डी. एन. रोडचा पहिला टप्पा खुला झाला आहे. कफ परेड येथील जी. डी. सोमाणी हा रस्ता मेट्रोच्या कामासाठी बंद होता. तोही सुरू करण्यात आला आहे. येत्या काही दिवसात आणखी काही रस्ते वाहतुकीसाठी खुले होतील.

या मार्गाच्या आरे ते बीकेसी टप्प्याचे काम ८६.४ टक्के पूर्ण झाले आहे. हा टप्पा सर्वात आधी सुरू होईल. तर बीकेसी ते कफ परेड या दुसऱ्या टप्प्याचे काम ७६ टक्के पूर्ण झाले आहे.